॥ दीपका मांडिले तुला सोनियाचे ताट ॥

गायिकाः सुमन काल्याणपूर
गीतः बा. भ. बोरकर
संगीतः कमलाकर भागवत

दीपका मांडिले तुला सोनियाचे ताट
जडविला घडविला चंदनाचा पाट
घरदार प्रकाशाने भरी कांठोकांठ
दारी आलेल्याची करू सोपी पायवाट ॥ धृ. ॥

घातली तुला ताईने रंगाची रांगोळी
पित्याने रेखिल्या गोड भविष्याच्या ओळी
घांशिली समई मी ही केली तेलवात
दह्यात हा कलविला जिरेसाळ भात ॥ १ ॥

गा रे राघू, गा ग मैने बाळाच्या य ओळी
मुखी तुमच्याही घालू दुधातली पोळी
कुतू काऊ चिऊ माऊ या रे सारे या रे
सांडलेली शिते गोड, उचलुनी घ्या रे ॥ २ ॥

गुणी माझा बाळ कसा मटामटा जेवी
आयुष्याने थोर करी माये कुलदेवी ॥ ३ ॥

जिरेसाळः भाताची जात